महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
वनार्टी कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(वनार्टी), महाराष्ट्र राज्य,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -४४००२२
Website : www.vanarti.in CIN: U84120MH2026NPL466492 ई-मेल :vanarti.info@gmail.com


जा .क्र. वनार्टी /नागपूर/आस्था/ 836/2026-27 दिनांक :-26/08/2026

# योजनेचा तपशील

## महाराष्ट्र राज्यातील 36 जिल्ह्यांमध्ये वनार्टी सेवादूत नियुक्ती करण्याबाबत

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) ही विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJ-NT) प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षणविषयक प्रगतीसाठी कार्यरत असलेली संस्था आहे. महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये शासनाच्या विविध योजना, सामाजिक उपक्रम, शैक्षणिक व रोजगारविषयक संधी तसेच संबंधित संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, योजनांचा प्रचार व प्रसार करणे, पात्र लाभार्थ्यांचे मार्गदर्शन करणे, क्षेत्रीय स्तरावर माहिती संकलित करणे व जनजागृती करणे या उद्देशाने **"वनार्टी सेवादूत प्रकल्प"** राबविण्याचे प्रस्तावित आहे.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील 36 **जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी** 01 **पुरुष व** 01 **महिला**, अशा एकूण 72 **सेवादूतांची** नियुक्ती करण्यात येत आहे. **"वनार्टी सेवादूत प्रकल्प"** अंतर्गत सेवादूत पदासाठी पात्र उमेदवारांना **ऑनलाइन तसेच ऑफलाइन** अशा दोन्ही पद्धतीने अर्ज करता येईल.

## उद्देश

1. शासनाच्या व संबंधित संस्थेच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे.
2. योजनांबाबत समाजामध्ये जनजागृती निर्माण करणे.
3. पात्र लाभार्थ्यांना अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे व योजनेच्या अटींबाबत मार्गदर्शन करणे.
4. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्राथमिक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.
5. क्षेत्रीय स्तरावर योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भातील माहिती संकलित करणे.
6. लाभार्थी व संबंधित शासकीय/निमशासकीय यंत्रणा यांच्यामध्ये समन्वय साधण्यास सहाय्य करणे.
7. योजनांच्या प्रभावी प्रचार-प्रसारासाठी स्थानिक पातळीवर कार्यरत संस्था, स्वयंसेवी संस्था व सामाजिक कार्यकर्त्यांशी समन्वय साधणे.
8. VJ-NT प्रवर्गातील अत्यंत मागास, वंचित तसेच विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या जाती व उपजातींचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून अभ्यास करून त्यांच्या समस्या,

गरजा व अडचणी यांचे क्षेत्रीय स्तरावर संकलन करणे आणि त्यांच्या निराकरणासाठी आवश्यक उपाययोजना व शिफारशी सुचविणे.

9. VJ-NT प्रवर्गातील वैशिष्ट्यपूर्ण जाती व उपजाती यांच्या संस्कृती, पोशाख, खाद्यपरंपरा, चालीरीती, प्रथा, उत्सव, लोकसाहित्य, लोकगीते, राहणीमान, पारंपरिक कला व इतर सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा अभ्यास, दस्तऐवजीकरण व नोंदणी करणे.
10. VJ-NT प्रवर्गातील विविध जाती व उपजातींच्या सामाजिक, सांस्कृतिक व विकासात्मक बाबींशी संबंधित क्षेत्रीय माहितीचे संकलन करून संबंधित संस्था व यंत्रणांना उपलब्ध करून देणे.

## सेवादूतांची संख्या

महाराष्ट्र राज्यातील एकूण 36 जिल्ह्यांसाठी पुढीलप्रमाणे सेवादूतांची नियुक्ती प्रस्तावित आहे :

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| 1 | पुरुष सेवादूत | 36 |
| 2 | महिला सेवादूत | 36 |
| **एकूण सेवादूत** | | 72 |

प्रत्येक जिल्ह्यासाठी 01 **पुरुष व** 01 **महिला सेवादूत** नियुक्त करण्यात येईल. सदर प्रकल्पाचा कालावधी 11 **महिने** राहील. सेवादूतांना त्यांच्या कार्यक्षेत्रात योजनांचा प्रचार-प्रसार, जनजागृती, लाभार्थी मार्गदर्शन, क्षेत्रीय माहिती संकलन व अहवाल सादरीकरणाचे कार्य करावे लागेल.

## मानधन व प्रवास भत्ता

प्रत्येक सेवादूतास खालीलप्रमाणे आर्थिक लाभ देय राहील :

- **मानधन : रु.** 5,000/- **प्रति महिना**
- **प्रवास भत्ता : रु.** 5,000/- **प्रति महिना**

सदर मानधन व प्रवास भत्ता हा प्रत्यक्ष कार्य, उपस्थिती व संस्थेने निश्चित केलेल्या नियम व अटींच्या अधीन राहून देय राहील.

## सेवादूत पदासाठी पात्रता निकष

### वयोमर्यादा

1. उमेदवाराचे वय किमान 25 **वर्षे** व कमाल 50 **वर्षे** असावे.
2. शासनाच्या प्रचलित नियमांनुसार पात्र राखीव प्रवर्गातील उमेदवारांना वयोमर्यादेत सवलत देण्यात येईल.

### शैक्षणिक पात्रता

1. किमान १२वी / पदवीधर / पदव्युत्तर उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य.

2. समाजकार्य, ग्रामीण विकास, सामाजिक शास्त्रे, विधी, व्यवस्थापन, संगणक किंवा तत्सम विषयातील पदवीधारक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

**संगणक ज्ञान**

उमेदवारास खालील बाबींचे प्राथमिक/आवश्यक ज्ञान असणे अपेक्षित आहे :

1. संगणक हाताळणी.
2. MS Office.
3. ई-मेलचा वापर.
4. ऑनलाइन माहिती भरणे.
5. ऑनलाइन अहवाल सादर करणे.
6. आवश्यकतेनुसार डिजिटल माध्यमांचा वापर.

**स्थानिक पात्रता**

1. उमेदवार संबंधित जिल्ह्याचा रहिवासी असावा/असावी.
2. मराठी भाषेचे वाचन, लेखन व संभाषणाचे चांगले ज्ञान असावे.
3. संबंधित जिल्ह्यातील सामाजिक, भौगोलिक व स्थानिक परिस्थितीची माहिती असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

**अनुभव**

पुढीलपैकी कोणत्याही क्षेत्रातील अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल : सामाजिक क्षेत्र, स्वयंसेवी संस्था, शासकीय योजनांचा प्रचार व प्रसार, जनजागृती अभियान. सर्वेक्षण कार्य. समुदाय विकास. ग्रामीण विकास. लाभार्थी मार्गदर्शन व समन्वय.

**इतर अर्हता**

1. उमेदवारामध्ये चांगले संवाद कौशल्य असावे.
2. नेतृत्वगुण व संघटन कौशल्य असावे.
3. नागरिकांशी व लाभार्थ्यांशी सौहार्दपूर्ण संवाद साधण्याची क्षमता असावी.
4. क्षेत्रीय स्तरावर भ्रमण करण्याची तयारी असावी.
5. संस्थेने सोपविलेली क्षेत्रीय कामे वेळेत पूर्ण करण्याची क्षमता असावी.
6. उमेदवाराविरुद्ध कोणताही गंभीर फौजदारी गुन्हा दाखल नसावा.

**सेवादूतांची प्रमुख कामे व जबाबदाऱ्या**

1. संबंधित जिल्ह्यात शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे.
2. पात्र लाभार्थ्यांची प्राथमिक माहिती संकलित करणे.
3. योजनांसाठी आवश्यक पात्रता व कागदपत्रांबाबत प्राथमिक मार्गदर्शन करणे.
4. योजनांच्या अर्ज प्रक्रियेबाबत नागरिकांना माहिती देणे.
5. ग्रामीण, दुर्गम व वंचित भागात जनजागृती करणे.
6. महिला, युवक, विद्यार्थी, वंचित घटक व गरजू लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविणे.
7. स्थानिक पातळीवर जनजागृती बैठका, मार्गदर्शन शिबिरे व माहिती अभियान आयोजित करण्यास सहाय्य करणे.

8. संबंधित शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था व सामाजिक संस्थांशी आवश्यक समन्वय साधणे.
9. क्षेत्रीय कामकाजाचा नियमित अहवाल संस्थेस सादर करणे.
10. संस्थेकडून वेळोवेळी देण्यात येणारी इतर क्षेत्रीय स्वरूपाची कामे पार पाडणे.

**निवड प्रक्रिया**

सेवादूतांची निवड संस्थेने निश्चित केलेल्या निकषांनुसार करण्यात येईल. निवड प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार खालील बाबींचा समावेश करता येईल :

1. अर्जांची छाननी.
2. शैक्षणिक पात्रतेची पडताळणी.
3. अनुभवाची पडताळणी.
4. स्थानिक रहिवासाची पडताळणी.
5. मुलाखत/निवड चाचणी.
6. अंतिम पात्र उमेदवारांची निवड.

निवड प्रक्रियेचा अंतिम निर्णय संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याचा राहील.

**आवश्यक कागदपत्रे**

अर्ज करताना उमेदवाराने खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील :

1. आधार कार्ड.
2. रहिवासी/अधिवास प्रमाणपत्र.
3. शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका.
4. संबंधित जिल्ह्याचा रहिवासी असल्याचा पुरावा.
5. अनुभव प्रमाणपत्र, लागू असल्यास.
6. संगणक पात्रता प्रमाणपत्र, लागू असल्यास.
7. जात प्रमाणपत्र, लागू असल्यास.
8. राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी संबंधित वैध कागदपत्रे.
9. पासपोर्ट आकाराचा फोटो.
10. संस्थेने मागणी केलेली इतर आवश्यक कागदपत्रे.

**कार्यक्षेत्र**

प्रत्येक सेवादूताची नियुक्ती संबंधित जिल्ह्यासाठी करण्यात येईल. नियुक्त सेवादूताने संबंधित जिल्ह्यातील विविध तालुके, ग्रामीण व शहरी भाग तसेच आवश्यकतेनुसार संस्थेने निर्देशित केलेल्या क्षेत्रात काम करणे अपेक्षित राहील. VJ-NT प्रवर्गातील अत्यंत मागास व विकासाच्या प्रवाहापासून दूर असलेल्या जाती व उपजातींपर्यंत पोहोचून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक परिस्थितीची क्षेत्रीय माहिती संकलित करणे, त्यांच्या समस्या व गरजा समजून घेणे तसेच संबंधित यंत्रणांच्या निदर्शनास आणून देणे अपेक्षित राहील.

महिला सेवादूतांना विशेषतः महिला लाभार्थी, महिला बचतगट, विद्यार्थिनी व इतर महिला-केंद्रित उपक्रमांमध्ये जनजागृती व मार्गदर्शनासाठी सहभागी करून घेता येईल. तसेच VJ-NT प्रवर्गातील महिला, महिला बचतगट व पारंपरिक सांस्कृतिक घटकांच्या सहभागातून त्यांच्या संस्कृती, परंपरा व वारशाचे दस्तऐवजीकरण व संवर्धन करण्याच्या उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग घेता येईल.

**अहवाल व कामाचे मूल्यमापन**

1. सेवादूताने केलेल्या क्षेत्रीय कामाचा नियमित अहवाल संस्थेस सादर करणे आवश्यक राहील.
2. योजनांच्या प्रचार-प्रसाराची माहिती, लाभार्थी संपर्क, जनजागृती उपक्रम व इतर क्षेत्रीय कामकाजाचा तपशील अहवालात नमूद करावा.
3. सेवादूतांच्या कार्यक्षमतेचे वेळोवेळी मूल्यमापन करण्यात येईल.
4. समाधानकारक कामगिरी न करणाऱ्या सेवादूताबाबत संस्थेच्या नियमांनुसार आवश्यक निर्णय घेण्यात येईल.

**अर्ज करण्याची पद्धत**

"वनार्टी सेवादूत प्रकल्प" अंतर्गत पात्र उमेदवारांना **ऑनलाइन किंवा ऑफलाइन** पद्धतीने अर्ज करता येईल.

1. **ऑनलाइन अर्ज :**

   वनार्टीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध **"वनार्टी सेवादूत प्रकल्प — ऑनलाइन अर्ज"** या लिंकद्वारे अर्ज करावा. अर्जामध्ये आवश्यक माहिती भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. अर्ज **Submit** केल्यानंतर अर्ज क्रमांक/पावती जतन करावी. अपूर्ण किंवा आवश्यक कागदपत्रांशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

2. **ऑफलाइन अर्ज :**

   विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह **संबंधित जिल्ह्यातील सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या कार्यालयात** कार्यालयीन वेळेत जमा करावा. अर्जाच्या लिफाफ्यावर **"वनार्टी सेवादूत प्रकल्प — सेवादूत पदासाठी अर्ज"** असे नमूद करावे.

**अटी व शर्ती**

1. सेवादूतांची नियुक्ती केवळ प्रकल्पाच्या कालावधीपुरती मर्यादित राहील व त्यातून कायमस्वरूपी सेवेत नियुक्तीचा हक्क प्राप्त होणार नाही.
2. मानधन व प्रवास भत्ता संस्थेच्या नियमांनुसार व प्रत्यक्ष कार्याच्या आधारे देय राहील.
3. अर्जातील सर्व माहिती खरी व अचूक असणे आवश्यक आहे. चुकीची/खोटी माहिती आढळल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.
4. निवडीनंतर सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.
5. सेवादूताने संस्थेच्या मार्गदर्शक सूचना, आचारसंहिता व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
6. आवश्यकतेनुसार संबंधित जिल्ह्यात क्षेत्रीय काम व भ्रमण करणे बंधनकारक राहील.

7. योजनेच्या अटी, निवड प्रक्रिया, मानधन, कार्यपद्धती, कालावधी, संख्या, कार्यक्षेत्र किंवा जबाबदाऱ्यांमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी यांना राहील.
8. योजनेची अधिकृत माहिती व ऑनलाइन अर्जासाठी संकेतस्थळ vanarti.in वर जाऊन अर्ज करण्यात यावा.
9. सेवादूत पदासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक 30/08/2026 राहील.
10. निर्धारित अंतिम तारखेपर्यंत आवश्यक संख्येने पात्र उमेदवारांचे अर्ज प्राप्त न झाल्यास, उमेदवारांची संख्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख आवश्यकतेनुसार वाढविण्यात येऊ शकते. सदर मुदतवाढीबाबतची माहिती वनार्टीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
11. अधिक माहितीसाठी वनार्टी कॉल सेंटर : 7887882026

**स्वा**
**प्रशांत वावगे**
**प्र. व्यवस्थापकीय संचालक**
**वसंतराव नाईक संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था, (वनार्टी)**